

देगलूर : रुग्णसेवा मंडळाच्या वतीने महिला आरोग्यविषयक शिबिर घेण्यात आले.

# आरोग्य शिबिरात दिली कर्करोगाची माहिती

देगलूर : देगलूर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि रुग्णसेवा मंडळाच्या वतीने महिला आरोग्यविषयक मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले. कार्यक्रमाला रुग्णसेवा मंडळाचे उपाध्यक्ष सूर्यकांत नारलावार, कार्यकारिणी सदस्य देवेंद्र मोतेवार, कोषाध्यक्ष प्रा. चिंतावार, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार उपस्थित होते. मार्गदर्शन शिबिरात डॉ. शोभा भूमे, डॉ. गीता रेखावार, डॉ. गीता बालूरकर यांनी आरोग्यविषयक समस्या, लैंगिक आरोग्य, मानसिक आरोग्य, महिलांमधील कर्करोग या विषयावर मार्गदर्शन केले. प्रा.डॉ. बालाजी कतूरवार यांनी शिबिर आयोजनामागील उद्देश स्पष्ट केला. सूत्रसंचालन डॉ. संजय देवडे, आभार प्रा. संतोष येरावार यांनी मानले. याप्रसंगी डॉ. खंदकुरे व्यंकट, प्रा. गणेश केदारे, डॉ. संतोष येरावार, प्रा. संतोष वानोळे, प्रा. अंकिता ऐन्लावार, प्रा. रेणुका लक्षटे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner